
# १९४७ चे अविदित महानायक..!



जन्म दि. २४ नोव्हे. १८८३ मृत्यु दि. ५ जून १९५३

## स्व. भिकाजी (उपाख्य) अप्पासाहेब फाटक

संस्थापक

धरमपेठ शिक्षण संस्था, नागपूर.

# १९४७ चे अविदित महानायक..!

# स्वर्गीय भिकाजी (उपाख्य) अप्पासाहेब फाटक


धरमपेठ शिक्षण संस्था

श्रीमती मीराबाई संचेती धरमपेठ कन्या शाळा परिसर,
उत्तर अंबाझरी मार्ग,
धरमपेठ, नागपूर- ४४००१० (म. रा.)

## संकलन
सौ. योगिता आचार्य
सौ. मृणालिनी सक्सेना

## मुखपृष्ठ
प्रा. पितांबर हुमने
सौ. सुजाता अली

## संपादकीय मंडळ
प्रा. पितांबर हुमने
सौ. सुजाता अली
सौ. रुमा कापरे
कु. विशाखा कासखेडीकर

## प्रकाशन
३ जुलै २०२२ रोजी

## प्रकाशक
धरमपेठ शिक्षण संस्थेचे
धरमपेठ मनोहर पांडुरंग देव स्मृती विज्ञान महाविद्यालय,
नागपूर- ४४००३३

# १९४७ चे अविदित महानायक..!

# स्वर्गीय भिकाजी (उपाख्य)

# अप्पासाहेब फाटक

भारताचा स्वतंत्रता संग्राम हा लाखो लोकांच्या संघर्ष आणि बलिदानाने रंगलेला आहे. मंगल पांडे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, भगतसिंग, जवाहरलाल नेहरु, वि. दा. सावरकर ही नावे प्रामुख्याने आपल्या स्मरणात राहतात. हे जहाल अथवा मवाळ स्वातंत्र्यसेनानी स्मरणात राहण्याचे

मुख्य कारण म्हणजे यांनी राजकीय क्षेत्रात इंग्रजांशी समोरा-समोर जाऊन टक्कर दिली. अर्थातच त्यांना इतिहासात मानाचे स्थान मिळणे स्वाभाविक होते. परंतु असेही अनेक अवदित लोक होते ज्यांनी देशासाठी सर्वस्व अर्पण केले. शिक्षण असो किंवा सामाजिक क्षेत्र असो त्यात मोलाचे योगदान दिले. स्वातंत्र्य मिळविणे जेवढे आवश्यक होते तेवढेच महत्त्वाचे ते टिकविणे होते.

स्वतंत्रता व सार्वभौमत्व टिकविण्यासाठी आपले वैज्ञानिक, अभियंता, शिक्षक, अधिकारी वर्ग उभा करण्यासाठी विचार व समाज मंथन आवश्यक होते. हे जाणूनच काही द्रष्टे लोक स्त्री सबलीकरण,

अंधश्रद्धा निर्मूलन, जातीय समानता, दारिद्रय निवारण, शिक्षण या सारख्या पायाभूत सामाजिक गरजांवर भर देत होते. त्यांचाही देशाला सशक्त करण्यात मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतातील श्री. भिकाजी फाटक हे असेच एक अविदित महानायक होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे ते समर्थक व अनुयायी होते. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी आपला सामाजिक धर्म निभाविण्याचा निर्धार केला होता.

“मनुष्य स्वभावाने कितीही चांगला असला तरी शिक्षणाने त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय देशाची उन्नती होऊ शकत नाही.”

-बाळ गंगाधर टिळक.

ह्या विचारांनी प्रेरित होऊन श्री. भिकाजी फाटक यांनीही समाज उत्थानात आपला खारीचा वाटा वहन करायचे ठरविले. ह्याच प्रेरणेतून धरमपेठ शिक्षण संस्थेचे बीज रोवले गेले, जे आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झालेले आहे.

स्वर्गीय श्री. भिकाजी (उपाख्य) अप्पासाहेब रामचंद्र फाटक या महानायकाचा जन्म दिनांक २४

नोव्हेंबर १८८३ रोजी झाला. साधी राहणी, उच्च विचारसरणी या तत्त्वावर चालणारे असे हे श्री. अप्पासाहेब फाटक.

श्री. भिकाजी फाटक यांचा कालावधी तसा बघितला तर अतिशय रुढीवादी, परंपरागत विचारसरणीला धरून चालणारा असा होता. परंतु अशाही काळात श्री. भिकाजी फाटक यांचे विचार हे अतिशय प्रगत असे होते. स्वातंत्र्यपूर्व कालावधीमध्ये शिक्षणाला फारसे महत्त्व नव्हते. त्यामुळे तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहोचतच नव्हता. अशावेळी स्वातंत्र्याचे महत्त्व आणि ते कसे टिकवावे हे समजावून सांगण्यासाठी

आणि समाजाचा विकास करण्यासाठी त्यांनी नागपूर शहरातील धरमपेठ भागात आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने घराच्या गॅरेजमध्ये पहिली शाळा सुरू केली आणि सामाजिक कार्यात आपला मोलाचा हातभार लावला. ह्याच प्रेरणेतून धरमपेठ शाळेचे बीज रोवले गेले, जे आज "धरमपेठ शिक्षण संस्था" ही एका विशाल वटवृक्षात परिवर्तित झाली. श्री. भिकाजी फाटक यांनी वर्ष १९२९ मध्ये सुरू केलेली धरमपेठ मुलांची व धरमपेठ कन्या शाळा, तसेच आज अस्तित्वात असलेले आर. एस. मुंडले कला, वाणिज्य महाविद्यालय, म. पां. देव स्मृती विज्ञान महाविद्यालय, धरमपेठ तंत्रनिकेतन, आर.

एस. मुंडले शाळा, तारकुंडे धरमपेठ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नटराज कला व संस्कृती केंद्र नागपूर, धरमपेठ पब्लिक स्कूल, श्रीमती मीराबाई संचेती धरमपेठ कन्या शाळा, धरमपेठ इंग्लिश मीडियम शाळा, रजत महोत्सव धरमपेठ माध्यमिक शाळा, इतक्या रूपांनी नवीन पिढीला सुशिक्षित व संस्कारित करण्यात अग्रेसर आहे.

धर्म आणि व्यावहारिक जीवन वेगळे नाही. सामाजिक क्षेत्रात कार्य करण्यासाठी संसारात राहूनही ते करता येऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री. भिकाजी रामचंद्र फाटक हे होय. स्वतःच्या परिवाराच्या भिंतींचा विस्तार करून त्यात

संपूर्ण समाजाला समाविष्ट करून घेणे म्हणजेच मानवतेची नि:स्वार्थ सेवा होय आणि ईश्वरसेवा ह्याहून वेगळी ती काय!

"हे मातृभूमी तुझ्यासाठी मरण ते जनन !

तुजविण जनन ते मरण !!"

-वि. दा. सावरकर

या भावनेने श्री. भिकाजी फाटक यांनी आपले पूर्ण जीवन समाजासाठी समर्पित केले. धरमपेठ परिसरात त्यांनी धरमपेठ मुलांची व मुलींची अशा दोन वेगवेगळ्या शाळा काढल्या. मुलींनी शाळेत यावे या करिता त्यांनी सदैव पुढाकार घेतला. गरीब

मुलांनी आर्थिक विवंचनेमुळे ज्ञानापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी त्या मुलांच्या राहण्याची, खाण्याची व्यवस्था करण्यासाठी स्वतःच्या घराची दारे उघडी केली होती. ह्या कार्यात श्री. भिकाजी फाटक यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई फाटक यांनी पूर्णपणे साथ दिली. आठवड्यातील वार त्यांनी मुलांना वाटून दिले व वारानुसार ती मुले घरी येऊन पोटभर जेवत असत. त्यांच्या राहण्याचा, पुस्तकांचा व जेवणाचा शक्यतो भार श्री. भिकाजी फाटक यांनी स्वतःवर घेतला. नागपूर जवळील गावांहुन आलेल्या मुलांना त्यांचा अतिशय आधार होता. शाळा सुरू

करणे हा व्यवसाय नसून, ती एक देशसेवा आहे, असा त्यांचा उद्देश होता.

“कितीही संकटे आली, आभाळ जरी कोसळले, तरी त्यावर पाय ठेवून उभा राहीन” "देशकार्य हेच देवकार्य"- या श्री. टिळकांच्या ब्रीदवाक्यांचे श्री. भिकाजी फाटक उपासक होते. त्यावेळी शाळा सुरू करणे ही काही साधी गोष्ट नव्हती. पुरेसा पैसा नव्हता, पुरेसे मनुष्यबळ नव्हते. समाज जुन्याच विचारसरणीत जगत होता. अशावेळी लोकं मुलांना शाळेत पाठविणे टाळत होते. एवढे मोठे कार्य करून सुद्धा श्री. भिकाजींचे मन मात्र सैरभर होते, त्यांना समाजासाठी अजून काही

करायचे होते, परंतु पैशांची व्यवस्था कशी करावी हा प्रश्न होता. पण श्री. भिकाजींनी या मधून सुद्धा मार्ग शोधून काढला. तेव्हा श्री. भिकाजी फाटक हे महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांना जो पगार मिळत होता तो नाण्यांच्या स्वरूपात राहत होता, कारण त्यावेळी नोटांचे चलनवलन फारसे नव्हते. ज्या दिवशी पगार होत असे त्या दिवशी ते तो सगळा पगार एका पात्रात टाकीत असत आणि संपूर्ण पगार देवापुढे ठेवून त्यातील १0% पगार हा बाजूला काढीत असे. त्याचा उपयोग ते समाजकार्यासाठी आणि शिक्षणासाठी सुद्धा करीत असत. शिक्षण आणि

समाजकार्य हा त्यांनी आपल्या आयुष्याचा एक भाग म्हणून निवडला होता.

शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते. नागपुरातच नव्हे तर पुणे या सारख्या शहरांमध्ये सुद्धा त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान मोलाचे होते. नागपूरमध्ये सुद्धा ते अनेक शैक्षणिक संस्थांशी जोडले गेलेले होते. पहिली शाळा घरात जरी सुरू केली असली तरी यावरच थांबून चालणार नव्हते. त्यासाठी अधिक काही करावे अशी त्यांची सतत धावपळ सुरू होती. म्हणून त्यांनी समाजातील, धरमपेठ भागातील लोकांशी संपर्क साधला. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या जनसंपर्कातूनच

त्यांनी निधी जमा केला. धरमपेठ भागात जागा विकत घेतली. अशाप्रकारे गॅरेजमध्ये सुरू झालेली ही छोटीशी शाळा धरमपेठ शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आली. या छोट्याशा रोपट्याचा एक महाकाय वटवृक्ष तयार झाला. ज्याची मुळे सर्वदूर पसरली गेली आणि समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत ती पोहोचली. त्यांनी मुलांना एक प्रकारची आश्वासक सावली दिली. या वटवृक्षाच्या छायेत विभिन्न क्षेत्रांमधील अनेक महान लोकांची निर्मिती झाली. हे सगळे महत्कार्य करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे स्वर्गीय श्री. भिकाजी (उपाख्य) अप्पासाहेब रामचंद्र फाटक हे होय.

बाळ गंगाधर टिळकांचा श्री. भिकाजींच्या आयुष्यावर अतिशय प्रभाव होता. आधी लोकमान्य टिळक आणि नंतर स्वातंत्र्यवीर सावरकर या विचारवंतांच्या विचारांचा सहवास लाभणे हाच मुख्य दिव्यत्वाकडे जाण्याचा मार्ग आहे असा त्यांचा विश्वास होता. स्वदेशी, स्वराज्य या शब्दांनी व त्यातील उदात्त भावना व हेतूंनी श्री. भिकाजी नखशिखांत भारावले होते. नागपूर येथील कृषी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या प्रखर व भारदस्त व्यक्तिमत्त्वाने सगळेच प्रभावित होते. सदैव सदरा, धोतर व डोक्यावर पागोटे  या वेशात ते दिसायचे. स्वातंत्र्या पूर्वी तर

प्रश्नच नाही परंतु स्वतंत्रता प्राप्त झाल्यानंतर सुद्धा कधीही त्यांनी परदेशी वस्त्र व परिधानाचा स्वीकार केला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सच्चे सभासद म्हणून ते शेवटपर्यंत राहिले. "मोडेल पण वाकणार नाही" - असा त्यांचा बाणा. त्यांच्या ह्या प्रखर विचारांमुळे व मूल्यांची तडजोड न करण्याच्या स्वभावामुळे त्यांना त्यांच्या कार्यालयीन कारकीर्दीत अनंत अडचणींचा सामना करावा लागला. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर इंग्रज निघून गेले पण त्यांचे परिधान, विचार, भाषा लोकांमध्ये रूढ झाली होती. परंतु श्री. भिकाजी मात्र विदेशी प्रलोभनांना कधीही बळी पडले नाहीत. ते परिणामांची पर्वा न करिता

आपले मत मांडीत असत. त्यांच्या भारतीय परिधान धारण करण्याच्या अट्टाहासामुळे व विचारांमुळे ते कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य होऊ शकले नाहीत. मात्र उपप्राचार्य पद त्यांनी अवश्य भूशविले.

लोकमान्य टिळकांनी मुंबईला जनजागृती व एकोप्याकरिता सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. त्यावरून प्रेरणा घेऊन नागपुरातील धरमपेठ परिसरात श्री. भिकाजी यांनी मोठ्या प्रमाणात गणेश मंडळ स्थापन करून गणपती स्थापनेचा श्रीगणेशा केला. श्री. भिकाजींनी समाज जागृती व प्रबोधनाचा मार्ग ह्या गणेश मंडळ व उत्सवांनी सुकर केला. श्री. भिकाजी फाटक हे धरमपेठ शिक्षण संस्थेचे जनक व

प्रेरणास्त्रोत आहेत. स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव वर्ष साजरे करताना ह्या नावाजलेल्या परंतु विस्मृतीत गेलेल्या अविदित महानायकाची स्मृती पुनर्जीवित करणे अति आवश्यक आहे. हे जाणून आम्ही त्यांच्या परिवारजनांशी संपर्क करण्याचे ठरविले. प्रामुख्याने त्यांचे नातू श्री. मंगेशजी विनायकराव फाटक व डॉक्टर श्रीमती वैजयंती पांडे यांच्याशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचा उलगडा झाला. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात तर ते प्रणेते होतेच परंतु त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यातही श्री. भिकाजी यांचे विचार अतिशय प्रगत व पुढारलेले होते. डॉक्टर श्रीमती वैजयंती पांडे यांनी

त्यांच्या भारतीय वेशभूषा व भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा आवर्जून उल्लेख केला. डॉक्टर श्रीमती वैजयंती पांडे म्हणाल्या की, परिवारातील मुलींना त्यांनी नेहमी शिक्षित होण्यास व घराबाहेरील विश्वातही जाण्यास प्रेरित केले. त्यांच्या पत्नीच्या अकाली निधनानंतर त्यांनी त्यांची धाकटी मुलगी पुष्पा हिचे संगोपन स्वतः केले. तिला त्याकाळात श्री. भिकाजी यांनी पोस्टाची कामे, टेलिग्राम करणे इत्यादी कार्य शिकविले. बाहेरच्या कामातही स्वावलंबी बनविले असे आवर्जून डॉक्टर श्रीमती पांडे यांनी सांगितले. डॉक्टर श्रीमती वैजयंती पांडे म्हणाल्या की, “त्या खूप भाग्यवान

आहेत की असा थोर वारसा लाभलेल्या परिवारात त्यांचा जन्म झाला.”

श्री. मंगेशजी फाटक अर्थात भिकाजी यांचे नातू व श्री. विनायकराव फाटक यांचे पुत्र यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देताना म्हटले की, “श्री. भिकाजींचा आवाज इतका भारदस्त होता की पहाटे पाच वाजता जेव्हा ते त्यांच्या लहान भावाला आवाज देत असत तेव्हा त्यांचा आवाज परिसरातील इतरांसाठीही गजराचे काम करायचा.”

श्री. भिकाजी सतत समाज व शिक्षण क्षेत्रासाठी झुंजत राहिले आणि समाजसेवेलाही ईश्वरसेवा मानून

त्यांनी आपले जीवन व्यापन केले. अशा या थोर समाजसेवक, शिक्षाविद व धरमपेठ शिक्षण संस्थेचे जनक यांचा मृत्यू दिनांक ५ जून १९५३ रोजी झाला. अशा ह्या थोर १९४७ काळाच्या अविदित महानायकाला धरमपेठ शिक्षण संस्थेच्या संपूर्ण सदस्यांकडून ही शाब्दिक आदरांजली........!



******* समाप्त *******

# धरमपेठ शिक्षण संस्था

श्रीमती मीराबाई संचेती धरमपेठ कन्या शाळा परिसर,
उत्तर अंबाझरी मार्ग,
धरमपेठ, नागपूर- ४४००१० (म. रा.)